# मंगल प्रभात
# आणि इतर नाटके

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

**मंगल प्रभात आणि इतर नाटके : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये २८०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

# अनुक्रमणिका

## मंगल प्रभात


| अंक | प्रवेश | | पान नं. |
|---|---|---|---|
| पहिला | प्रवेश पहिला | ................. | ९ |
| | प्रवेश दुसरा | ................. | १३ |
| | प्रवेश तिसरा | ................. | १८ |
| | प्रवेश चौथा | ................. | २० |
| दुसरा | प्रवेश पहिला | ................. | २४ |
| | प्रवेश दुसरा | ................. | २७ |
| | प्रवेश तिसरा | ................. | ३१ |
| | प्रवेश चौथा | ................. | ३४ |
| तिसरा | प्रवेश पहिला | ................. | ३८ |
| | प्रवेश दुसरा | ................. | ४२ |
| | प्रवेश तिसरा | ................. | ४६ |
| | प्रवेश चौथा | ................. | ४७ |
| | प्रवेश पाचवा | ................. | ५२ |


## ते आपले घर


| | | | |
|---|---|---|---|
| पहिला | प्रवेश पहिला | ................. | ५९ |
| | प्रवेश दुसरा | ................. | ६३ |
| | प्रवेश तिसरा | ................. | ६५ |
| | प्रवेश चौथा | ................. | ६९ |
| | प्रवेश पाचवा | ................. | ७१ |

| | | | |
|---|---|---|---|
| दुसरा | प्रवेश पहिला | ................. | ७४ |
| | प्रवेश दुसरा | ................. | ७९ |
| | प्रवेश तिसरा | ................. | ८० |
| | प्रवेश चौथा | ................. | ८६ |
| | प्रवेश पाचवा | ................. | ८७ |
| | प्रवेश सहावा | ................. | ९० |
| तिसरा | प्रवेश पहिला | ................. | ९१ |
| | प्रवेश दुसरा | ................. | ९४ |
| | प्रवेश तिसरा | ................. | ९६ |
| | प्रवेश चौथा | ................. | ९८ |
| | प्रवेश पाचवा | ................. | १०० |
| चौथा | प्रवेश पहिला | ................. | १०२ |
| | प्रवेश दुसरा | ................. | १०३ |
| | प्रवेश तिसरा | ................. | १०३ |
| | प्रवेश चौथा | ................. | १०५ |
| | प्रवेश पाचवा | ................. | १०६ |
| | प्रवेश सहावा | ................. | १०८ |
| | प्रवेश सातवा | ................. | १११ |


## अस्पृश्योद्धार


| | | |
|---|---|---|
| प्रवेश पहिला | ................. | ११७ |
| प्रवेश दुसरा | ................. | १२० |
| प्रवेश तिसरा | ................. | १२३ |
| प्रवेश चौथा | ................. | १२५ |
| प्रवेश पाचवा | ................. | १२६ |
| प्रवेश सहावा | ................. | १२८ |
| प्रवेश सातवा | ................. | १२९ |
| प्रवेश आठवा | ................. | १३५ |
| प्रवेश नववा | ................. | १३७ |
| प्रवेश दहावा | ................. | १३९ |
| प्रवेश अकरावा | ................. | १४० |
| प्रवेश बारावा | ................. | १४१ |
| प्रवेश तेरावा | ................. | १४१ |
| प्रवेश चौदावा | ................. | १४४ |
| प्रवेश पंधरावा | ................. | १४६ |
| प्रवेश सोळावा | ................. | १४७ |
| प्रवेश सतरावा | ................. | १५२ |


## निळा पक्षी


| | | | |
|---|---|---|---|
| पहिला | लाकूडतोड्याची झोपडी | ................. | १५७ |
| दुसरा | प्रवेश पहिला | ................. | १७२ |
| | प्रवेश दुसरा | ................. | १७९ |
| तिसरा | प्रवेश पहिला | ................. | १८९ |
| | प्रवेश दुसरा | ................. | २०२ |
| चौथा | प्रवेश पहिला | ................. | २१९ |
| पाचवा | प्रवेश पहिला | ................. | २४० |
| | प्रवेश दुसरा | ................. | २४२ |
| | प्रवेश तिसरा | ................. | २४५ |
| सहावा | प्रवेश पहिला | ................. | २६२ |
| | प्रवेश दुसरा | ................. | २७० |
| | परिचय | ................. | २८० |


✦✦

# मंगल प्रभात

# मंगल प्रभात

## अंक पहिला

### प्रवेश पहिला

तुरुंगाचा देखावा. गज असलेली एक खोली. खोलीत एक कैदी असतो. त्याचे नाव शशांक. त्याची आई त्याला भेटायला आलेली असते. जेलर कुलूप उघडतो. खुर्चीवर बसतो.

**जेलर** : शशांक, तुमची आई तुमच्या भेटीला आलेली आहे. येथेच भेट होईल. (पोलीस आईला घेऊन येतात. आई जवळ जाऊ बघते.)

**जेलर** : येथे इकडेच बसा नि बोला. जवळ नाही जाता येणार.

**आई** : आई जवळ असली तरी लांब आहे, लांब असली तरी जवळ आहे. येथे बसते हो.

**शशांक** : आई, बरी आहेस तू ?

**आई** : तू बरा आहेस का ?

**शशांक** : माझे ठीक आहे. प्रकृती चांगली आहे.

**आई** : तोंडावरून तर तसे नाही वाटत. काय ही तुझी दशा झाली, डोळे खोल गेले, तू का आजारी आहेस ?

**शशांक** : नाही गं, आई. मी खरे सांगू ? आजकाल येथेच बरे वाटते. बाहेर असले म्हणजे आजूबाजूची परिस्थिती पाहून मन संतप्त होते. लोकांना खायला–प्यायला नाही. अन्नावाचून मरत आहेत. कसे पाहायचे सारे ? थंडीत गारठताहेत. उन्हात करपताहेत. ना अन्नवस्त्र, ना घरदार. काळा बाजार नि लाचलुचपती. स्वराज्य आले; परंतु जमाना बदलत नाही. वरती चार चांगली माणसे; परंतु खाली गोंधळ. पुंजीपतींना वाटत आहे, आपलेच सरकार आहे. जमीनदारांचे जुलूम चालूच आहेत. बिहारमध्ये अनेक

शेतकरी सत्याग्रह करीत आहेत असे ऐकले. जमीनदार त्यांना हाकलू पाहात आहेत. कधी जायची ही जमीनदारी ?

**आई** : जाईल, आज ना उद्या जाईल. परंतु गरिबांत तरी एकी हवी ना ? तेथे पुन्हा हिंदुमुसलमान, स्पृश्यास्पृश्य, अशा भानगडी आल्या म्हणजे काय करायचे ? मला तर निराशा वाटते, बाळ.

**जेलर** : घरगुती गोष्टी बोला.

**शशांक** : गरिबांची दुनिया हे माझे घर. सारे श्रमणारे माझे भाऊ. त्यांच्याविषयी मी बोलत आहे. आई, येथे तुरुंगात शांतपणे विचार करता येतो. रात्रीचा अंधार पाहून माणसास भय वाटते; परंतु प्रभात जवळच असते. नाही का? जगातील या मारामाऱ्या, ही युद्धे, पिळवणुकी, साऱ्या संपतील. दोनचार लोक सुखात नि ऐषआरामात राहावेत म्हणून कोट्यवधींचे होणारे रक्तशोषण थांबेल. गरिबांच्या रक्तशोषणाने कलंकित झालेले हे युग जाईल. नवीन युग येईल. खरे स्वराज्य येईल. हे काय ? आई, तुझ्या डोळ्यांतून पाणी आले ? रडू नकोस, मी हसतो आहे, तूही हस. तू बरी असलीस, सुखी असलीस, म्हणजे मी हसेन. हा बघ, मी हसतो आहे. तू हस ना जरा.

**आई** : कशी हसू, बाळ ?

**शशांक** : तुझ्या डोळ्यांतील पाणी बघून माझे धैर्य कसे राहील ? तू दूर असलीस तरी माझ्या हृदयाला तू धीर देतेस. मी तुरुंगात आलो तेव्हा अनेकांनी गळ्यात हार घातले; परंतु ते सारे सुकून गेले. त्यांनी केलेले जयजयकार तुरुंगाच्या या भिंती फोडून आत येऊ शकले नाहीत; परंतु आई, प्रेमाने थबथबलेला तुझा हात तू मुकेपणाने माझ्या डोक्यावर ठेवलास ! ते दृश्य रात्रंदिवस माझ्या डोळ्यांसमोर असते. आई, रडू नकोस.

**आई** : काय बोलतोस तू ? आईचे हृदयही तुला समजेनासे झाले का ? कसे पुसू हे डोळे ? रडू दे मला. येथे कोण आहे तुला ? पूर्वी हजारोंना अटक होई, तेव्हाचा निराळा प्रश्न. आज स्वराज्यात का अटक ? तू का पाप करीत होतास ? कोणा श्रीमंत काँग्रेसवाल्याने पोलिसात सांगावे, त्यांनी अटक करावी. काय करायचे ? तू येथे एकटा. ना येथे मित्र, ना सहकारी. रडू नको तर काय करू ? येथे तू नि मी आहोत. येथे तू लोकांचा पुढारी नाहीस. दुःखी विधवेचा तू एकुलता एक मुलगा आहेस.



**शशांक** : आई, तुला खरोखरच मी दुःख दिले. तुझे मनोरथ मी मातीत मिळविले. माझे सारे दिवस तुरुंगात जात आहेत. बाहेर सुखदुःखाचा, हसण्यारडण्याचा विराट संसार चालला आहे. नाना प्रकार, नाना बदल. बाहेर कधीकधी ऋतू येतो. कधी वसंत येतो; कधी आनंद, उत्सव. परंतु जेलमध्ये सारे दिवस सारखे, त्या लिंबाच्या झाडाच्या दोन फांद्या त्याच फक्त रोज दिसतात. आकाशाचा लहानसा तुकडा दिसतो. आई, कितीतरी तरुण जेलमध्ये बसून तरुणाचे पोक्त झाले. पोक्ताचे वृद्ध झाले आणि मेले. त्यांच्याप्रमाणे मीही एके दिवशी मरेन. इतर आयांप्रमाणे तू मनात आशा खेळवल्या असतील. परंतु मी तुझ्या आशा पूर्ण करू शकलो नाही.

**आई** : शशांक, तू मला सुख दिले नाहीस म्हणून का मी रडते ? नाही हो. आपल्या देशावर प्रेम करणे का पाप ? देशातील सर्वांचे संसार सुखाचे करण्यासाठी निर्मळ मार्गाने धडपडणे हेही का पाप ? आगलाव्यांची गोष्ट दूर राहो; परंतु तुम्ही निराळा मार्ग घेणारे. तरी का तुरुंग ? आणि वर्तमानपत्रेही तुमच्याविषयी काही देत नाहीत. कोणाचे लक्ष आहे तुमच्या या त्यागाकडे ?

**शशांक** : आई, कोणाचे असो वा नसो; आम्ही विजयी आहोत. समाजवादी विचार सर्वत्र पसरत आहेत. परवाच्या निवडणुकीत म्हणे समाजवादी निवडून आला ! आशेचा तो किरण आहे. आम्हाला तुरुंगात घालताना अधिकाऱ्यांचे मनही खात असेल. परंतु सत्तारूढ पक्षाला स्वत:चा मार्ग निष्कंटक ठेवायची इच्छा असेल. त्यांना त्यात देशहित वाटत असेल. परंतु, आई, काही झाले तरी जुना जमाना टिकणार नाही. आसपास बघ. भारतात नवयुग आणू तरच आशा. भारतात लवकर लोकशाही मार्गाने समाजवाद आला तर जगाला नवीन आशा दिल्यासारखे होईल. यासाठी समाजवादी पक्षाची धडपड. काँग्रेसला हे एक दिवस कळून येईल. नवीन जग येणार, नवसमाजनिर्मिती होणार. मला तर ती मंगल प्रभात दिसत आहे.

**आई** : मला नाही दिसत. किती जणांच्या मनात असे विचार खेळत आहेत ? आडनावे नि जातिपाती यांच्यापलीकडे कोण बघतो ? प्रांतभेद, भाषाभेद, जातिभेद, सारा बुजबुजाट आहे.

**शशांक** : आंधळ्याप्रमाणे वागणाऱ्यांची गोष्ट सोडून दे. आई, ती पाहा. सेवादले नवविचाराने संस्फूर्त होत आहेत. ते पाहा, मुंबईचे कामगार समाजवादी पक्षाभोवती, गुजराती की मराठी न बघता, इतर जातीय पुढाऱ्यांचे न ऐकता, काँग्रेसलाही दूर सारून सोशॅलिस्ट पार्टी गरीबोंकी पार्टी म्हणून उभे राहत आहेत; पुरुषोत्तमांना निवडून देत आहोत. आई, आई, आशेने राहा. माझी काळजी नको करू. मी कोण ? जनतासिंधूतील मी एक बिंदू. या अफाट दुनियेतील मी एक कण... आई, ते जाऊ दे. आपल्या शेतकरी पंचायतीची सांग ना हकिकत.

**आई** : तेथेही भांडणे. एकाला काँग्रेसवाल्याने फोडले. तेथे हिंदू-मुसलमान भानगडीही काहींनी सुरू केल्या. रहीम आता येत नाही.

**शशांक** : का बरं ?

**आई** : हिंदू-मुसलमान एक होणे अशक्य असा जातीयवादी प्रचार करीत असतात.

**शशांक** : नवभारतात सर्वांनी एकत्र राहिले पाहिजे. महात्माजींच्या महान बलिदानाचाही अर्थ तुम्हास कळू नये का ? रहीमला सांग, आम्ही अंतर देणार नाही. हिंदू-मुसलमान, शीख, ख्रिस्ती, पारशी सारे या भारतमातेचे. भारतमाता म्हणजे जगाचे प्रतीक. सारे धर्म येथे सुखाने नांदतील, सर्वांना एकत्र नांदविणे हाच धर्म.

**आई** : अरे, एक नवीन फौजदार आला आहे. तोही भेदभाव पाडणारा. जात्यंध माणसे खात्याखात्यांतून आहेत. हरिजन शेतकरी दूर होत आहेत, मुसलमान दूर होत आहेत, आपल्या या प्रदेशात सर्व धर्मांचे श्रमणारे लोक.

**शशांक** : जमीनदारांना आनंद झाला असेल फूट पाहून ?

**आई** : होय, ते वासुदेवराव तर गुर्मीत आहेत. रहीमचे नि त्यांचे भांडण झाले.

**शशांक** : का ?

**आई** : रहीमचे घर गळत होते. तो वासुदेवरावांकडे गेला व म्हणाला, ''थोडे पेंढे द्या. घर शिवीन.'' तर जमीनदार म्हणाला, ''कशाला घर शिवतोस ? तुझे घर नको. तुला दुसरीकडे जागा देतो. तिकडे घर बांध'' रहीम म्हणाला, ''तुम्हीच दुसरीकडे घर बांधा. माझी झोपडी सोडून मी जाणार नाही.''



**शशांक** : रहीमचे उत्तर झोंबले असेल ?

**आई** : चांगलेच झोंबले. वासुदेवराव तो बंधारा फोडून शेतीच्या जमिनींची पुन्हा मिठागरे करणार असे कानावर आले आहे. सर्वत्र असंतोष आहे.

**शशांक** : आई, रहीम चांगला आहे. आपण त्याला प्रेम द्यायला हवे. हिंदुस्थानात कोणासही असुरक्षित न वाटो. गांधीजी गेले, तेव्हा एक मुसलमान माता म्हणाली, ''या अल्ला ! अभी हमको कौन ?'' ते उद्‌गार आपण विसरता कामा नये. आम्ही सारे तुमच्यासाठी आहोत. साऱ्या मानवासाठी आहोत, असे म्हटले पाहिजे.

**जेलर** : वेळ संपला.

**शशांक** : आई, तुझा आशीर्वाद दे. डोक्यावर हात ठेव. (आई जेलरकडे बघते.)

**जेलर** : परवानगी आहे. (शशांक पायांवर डोके ठेवतो. ती त्याच्या डोक्यावर हात ठेवते.)

**जेलर** : टाइम इज अप. वेळ खलास, शशांकबाबू.
(कोणी बोलत नाही. माता शशांककडे बघत हळूहळू पुढे येते. पोलिसांबरोबर जाते. पडदा पडतो.)

### प्रवेश दुसरा

(मुनीमजींची कचेरी. पुढे पेटी घेऊन तो बसला आहे. कागदपत्रं आहेत. समोर शेतकरी, कुळे.)

**मुनीमजी** : ते काही नाही. पैसे ताबडतोब पाहिजेत. तुमची नुसती तोंडे पाहून काय करू ? मला गोड गोड गोष्टी नकोत. पैसे आणा. हात हालवीत कशाला आलात ? आणि भाते लवकर कापा.

**पहिला शेतकरी :** अजून भाताचा दाणा भरला नाही. एवढ्यात कशी कापायची ? मळणी काढायला वेळ आहे. दादा अजून.

**मुनीमजी** : शिवा, तू पैसे आणलेस ? तू रे रामू ? आणि तू रहीम ? जॉन काय म्हणतो? सारे का हजामती करायला आलेत?

**दुसरा शेतकरी :** दोन शब्द सांगू का ?

**मुनीमजी** : काही बोलू नको. पैशांचे बोल. जामीनदाराच्या मुलीचे मार्गशीर्षात लग्न. लग्न का लांबणीवर टाकता येते ? पैसे आणा. कर्जाचे पैसे. व्याज नाही,